RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २५(५)] मंगळवार, एप्रिल १७, २०१८/चैत्र २७, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे सचिव कार्यालय**

राजभवन, मुंबई ४०० ०३५, दिनांक २७ फेब्रुवारी २०१७

**उद्देशिका**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१२ (१) (२०१५)/अधिसूचना/२३८/२०१७.— महाराष्ट्राच्या राज्यपालांनी काढलेली पुढील अधिसूचना सर्वसाधारण माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे :—

**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) अन्वये राज्यपाल यांना जाहीर अधिसूचनेद्वारे असे निदेश देता येतील की संसद अथवा राज्य विधिमंडळानी पारित केलेला एखादा विशिष्ट अधिनियम, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या, त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असणार नाही, अथवा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अपवादांच्या व फेरबदलांच्या अधीन राहून, त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असेल;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेली अधिसूचना, क्रमांक आरबी/टीसी/ई-११०१९ (८९) (२०१३)/अधिसूचना-४/११२०/२०१४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) (यात यापुढे ज्याचा निर्देश " ग्रामपंचायत अधिनियम " असा करण्यात आला आहे) यामध्ये फेरबदल केलेले आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाने, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वित्तीय वर्ष २०१७-१८ पासून योजनांतर्गत खर्च व योजनेतर खर्च यांचे पुनर्वर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाने, दिनांक २७ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे यासंबंधात व्यापक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त शासन निर्णयाद्वारे जनजाति उपयोजनेला आता " आदिवासी घटक कार्यक्रम " म्हणून संबोधण्यात येईल ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिसूचनेद्वारे, संबंधित वार्षिक जनजाति उपयोजनेच्या एकूण जनजाति उपयोजना निधीच्या ५% पेक्षा कमी नसेल इतका निधी, अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार देण्यात येईल अशी तरतूद करण्यात आलेला नवीन खंड (ण), ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५४ ख मधील खंड (ढ) नंतर समाविष्ट करण्यात आला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** आदिवासी विकास विभागाच्या विनंतीवरून, दिनांक १३ एप्रिल २०१६ च्या अधिसूचनेद्वारे ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा ३) यामध्ये, ग्रामपंचायतीतील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार निधी देण्याचे सूत्र राहील, याची सुनिश्चिती करण्यासाठी आणखी सुधारणा करण्यात आली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** आदिवासी उपयोजनेचे पुनर्वर्गीकरण करण्यात आल्यामुळे ५% इतका निधी, आदिवासी घटक कार्यक्रम टक्केवारी म्हणून देण्याबाबत नव्याने व्याख्या करण्याची आवश्यकता आहे.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे ग्रामपंचायत अधिनियमामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :—

**अधिसूचना**

भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप परिच्छेद (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे असा निदेश देत आहे की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) हा, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना, आणखी पुढील फेरबदलांसह लागू होईल :—

**भाग तीन**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात फेरबदल**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याच्या कलम ५४ ख मधील खंड (ण) मध्ये दिनांक ३० ऑक्टोबर २०१४ च्या अधिसूचनेद्वारे समाविष्ट केल्याप्रमाणे आणि दिनांक १३ एप्रिल २०१६ च्या अधिसूचनेद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे :—

(एक) पहिल्या परंतुकासह दोन्ही ठिकाणी " जनजाती उप-योजना निधीच्या " या मजकुराऐवजी " आदिवासी घटक कार्यक्रम निधीच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) " संबंधित वार्षिक योजनेच्या " या मजकुराऐवजी " प्रत्येक वर्षी वार्षिक वित्तीय विवरणपत्रात अधोरेखित केल्याप्रमाणे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
राज्यपालांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.